
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month




# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५८ वे, अंक ६वा, मुंबई । ऑगस्ट २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 58, Issue : 6, Mumbai I August 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50






देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५८वे, अंक ६वा,
ऑगस्ट २०२५
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९


**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**


दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in




विद्यार्थी गुणगौरव सोहळा, अकोला



विद्यार्थी गुणगौरव सोहळा, सोलापूर



विद्यार्थी गुणगौरव सोहळा, संभाजीनगर


क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
Relaxing Huts
Tamarind Umbrella
Toy Train
Pottery
Kids Play Area
Bullocart
Farm Visit 365 Days Bhutta Party Sept & Oct
Hurda Party Dec-feb Farm Tourisim 365 Days
Kitty Parties 365 Days Birthdays 365 Days
Get Togethers 365 Days Dairy Farm Visit 365 365 Days
Glamping 365 365 Days
Pre & Post Wedding Shoots
Agro Tourism For Schools & Corporates
Direct from FARM FRESH Vegetables & fruits at Your Doorstep on SAME DAY
For BOOKINGS Call:
70137 78442 | 97039 77724
Farm: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms
Just 30 mins Drive from Gachibowli & Hitech City

## श्रावणी



दादर – मध्यवर्ती



मुलुंड



कल्याण

# संपादकीय

महोदय/महोदया,

आपल्या सर्वांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाने अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ संस्था उत्तरोत्तर प्रगती करत आहे आणि संस्थेच्या उद्दिष्टानुसार सर्व सभासदांच्या आणि एकदंरीत ज्ञाती बांधव/भगिनीच्या सेवेसाठी आणि उत्कर्षासाठी आम्ही सर्व कार्यकारणी मंडळ सदस्य सतत कार्य करीत आहोत. कोरोना काळामध्ये आम्हाला असे आढळून आले आहे की, केवळ आर्थिक अडचणीमुळे आपल्याला काही समाज बांधवांच्या/भगिनीच्या प्राणाला मुकावे लागले आहे विशेषत: नीमशहरी भागांमध्ये योग्य ती आरोग्य सेवा उपलब्ध न झाल्यामुळे वा आर्थिक परिस्थितीमुळे आपल्यातील काही ज्ञाती बांधवांना/भगिनीना त्यांचे प्राण गमावावे लागले आहेत. आपले संस्थेची सभासद संख्या ९ हजारावर गेली आहे. आपली ज्ञाती बांधव/भगिनी भारतभर पसरलेले आहेत. गेले ३-४ वर्षापासून आम्ही कार्यकारी मंडळ सदस्य आपल्या सभासदांसाठी योग्य ती माफक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासंबंधीच्या प्रयत्नावर विचारमंथन करत आहोत. चर्चेअंती आम्ही या निर्णयावर आलो आहोत की, आपण आपल्या सभासदांसाठी सामूहिक आरोग्यविमा राबविण्याचे हाती घेतले पाहिजे परंतु यासाठी लागणारी आवश्यक माहिती आपण संकलित केली पाहिजे. यादृष्टीने प्राथमिक तयारी म्हणून आम्ही सर्व सभासदांची त्यांनी सभासद अर्जामध्ये कळविलेल्या माहितीनुसार ती संकलित केली आहे. आपल्याला माहिती आहे की, आपली संस्था ८४ वर्षे जुनी असून जुन्यावेळी मोबाईल, ईमेल या सुविधा उपलब्ध नव्हत्या तसेच सभासद अर्जामध्ये जन्मतारीख सभासदांनी लिहावी हे ही नमूद केलेले नव्हते त्यामुळे आम्हाला असे आढळून आले आहे की आपल्या जन्मतारीखेची नोंद आमच्याकडे नाही.

आपल्या विदितच आहे की, कंपनीना त्यांची सामूहिक आरोग्यविमा योजना राबविण्यासाठी त्यामध्ये भाग घेणाऱ्या इच्छुक सभासदांकडून सर्व माहिती मुख्यत्वय त्यांचे वय यांची योग्य ती पडताळणी करणे आवश्यक आहे व सर्व भाग घेऊ इच्छुणाऱ्या सभासदांचे वयोमानाचा विचार करून योग्य ती विमा योजना त्यांच्या लाभासहीत तसेच त्या विमा कंपनीचया धोरणानुसार विम्याचा दर या विमा कंपन्या देऊ करता याचा विचार करून आम्ही संकलित केलेल्या सभासदांच्या माहितीमध्ये प्रत्येक सभासदांची जन्मतारीख म्हणजे वय नमूद करणे आवश्यक आहे. याचा विचार करून इच्छुक सभासदांनी त्यांची खालील माहिती देणे अत्यावश्यक आहे जेणेकरून बाजारात असलेल्या योग्य त्या विमा कंपन्याकडून माफक दरात आपल्याला सामूहिक आरोग्यविमा राबविणे शक्य होऊ शकते.

आपल्या सगळयांना ज्ञात आहे की, जेवढे जास्त सभासद तेवढे विमा हप्ता कमी असतो याचा विचार करून जास्तीत जास्त सभसदांनी त्यांची माहिती खालील तक्तानुसार कार्यालयात व्हाटस्‌ॲप, ईमेल दूरध्वनी क्र. वर पाठवावी ही विनंती म्हणजे सभसदांच्या उत्कर्षासाठी किंवा त्यांना माफक आरोग्यविमा सेवेचा लाभ संस्था देऊ शकेल. ईमेल : aadrbm@gmail.com

आरोग्यविमाकरीता आवश्यक असलेली माहिती खालीलप्रमाणे द्यावी :-

१) संपूर्ण नाव :-

२) पत्ता पीनकोड सहित :-

३) मोबाईल नंबर :-

४) जन्मतारीख :-

५) ईमेल :-

# रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ग्राहकाभिमुख निर्णय

महोदय/महोदया,

आपल्या सर्वांचे हल्लीच्या काळात बँकेमध्ये खाते असणे अनिवार्य आहे त्याचे कारण रोखीच्या व्यवहारांना सध्या पूर्णपणे कालबाह्यता प्राप्त झाली आहे. अनेक वर्षानंतर सर्व सामान्य बँक ग्राहकांच्या हिताच्यादृष्टीने तसेच त्याचे हितसंबध जपण्याच्या दृष्टीने आपल्या अग्रणी बँकेने म्हणजे रिझर्व्ह बँकेने ग्राहक हिताचे अनेक निर्णय घेतले आहे त्याचे संक्षिप्त माहिती खालीप्रमाणे–आपल्यातले बहुतेक सभासद ज्येष्ठ नागरीक झाले असून त्यांना त्यांच्या बँक खात्यामधून नॉमिनेशन देणे रिझर्व्ह बँकेने अनिवार्य केले आहे. जेणेकरून त्या बँकखाते धारकांच्या निधनानंतर त्यांच्या खात्यांमध्ये जमा असलेली रक्कम त्याच्या नातेवाईकांना किंवा नॉमिनीला मिळविणे जिकिरीचे जात होते आणि अनेक वेळा अशा खात्यामध्ये जमा असलेली प्रचंड रक्कम बँकाकडे पडून आहे. याशिवाय जरी नॉमिनेशन केले असेल तरी दोन किंवा तीन नॉमिनेशन असेल तर ती रक्कम कोणाला कशा हिस्यानुसार द्यायची ते नियम आतापर्यंत बँकांकडे नव्हते. त्यामुळे आपल्या नातेवाईकांच्या खात्यामध्ये जमा असलेली रक्कम व ठेव त्यांच्या नॉमिनी व वारसाना बँकेकडून मिळविण्यासाठी अनेक वेळा कोर्टकचेरी व वेळाचा अपव्यय होत असे. ग्राहकांच्या हिताचा विचार करून रिझर्व्ह बँकेंना खालील निर्देश दिले आहेत. १) बँक खातेदाराला खाते उघडण्याच्या वेळी व नंतर जास्तीत जास्त चार व्यक्तींची नॉमिनी म्हणून नेमणूक करता येते व तसेच त्या खातेदाराच्या मृत्युपश्चात त्याच्या नावे जमा असलेल्या रक्कमेमध्ये कोणाचा किती वाटा असेल हे बँकेला आदेश देण्याचा आधिकार खातेदाराला दिला आहे. २) पुढे रिझर्व्ह बँकेने असे आदेश दिले आहे की, बँक खातेदारानी कुठल्या नॉमिनीला किती हिस्सा द्यायचा हे कळविले नसेल तर सर्वांना ही नॉमिनीना समप्रमाणात त्याचा हिस्सा मिळेल. ३) जर बँक खातेदाराने नेमलेल्या नॉमिनी पैकी कोणी मृत पावल्यास आणि खातेदाराना त्यांच्या मृत्युपश्चात त्यांचा नावे जमा असलेल्या रक्कमेचा हिस्सा बँकेला न कळविल्यास एका नॉमिनीला ५० टक्के आणि इतर दोन नॉमिनीला बाकीची रक्कम मिळू शकते. वरील सर्वच आदेश रिझर्व्ह बँकेने ५ ते ६ महिन्यापूर्वी सर्व बँकाना दिले होते. परंतु त्यानंतर असे आढळून आले की, बँक खातेदारांच्या मृत्युपश्चात त्यांच्या वारसाला व नॉमिनीला मृत व्यक्तीच्या बँक खातेदाराच्या नॉमिनीला अनंत अडचणी येत होत्या. याचा विचार करून दि. ६ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने या अडचणी व क्लिष्टपणा यावर मात करण्यासाठी नविन निर्देश सर्व बँकांना दिले आहे ते असे. ते खालीलप्रमाणे – १) मृत खातेदाराच्या मृत्यूनंतर त्या खातेदाराचा वारसदार व नॉमिनी यापुढे जास्त कागदपत्राची जमा करण्याची आवश्यकता वा कुठलाही त्या मृतव्यक्तींच्या बँक खात्याच्या नावे जमा असलेली रक्कम मिळविण्यासाठी वारस असलेले प्रमाणपत्र व प्रोबेट जमा करण्याची आवश्यकता नाही वा कुठल्याही प्रकारची बंधपत्रे (इन्डेमिनिटी बॉन्ड) दाखल करण्याची आवश्कता नाही, त्याला ती रक्कम मिळविण्यासाठी मृत खातेदाराचा मृत्यू दाखला, बँकेचा दावा पत्रक आणि आवश्यक ती ओळख कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे. २) जर मृत खातेदारानी कोणालाही त्याचा नॉमिनी व वारसदार नेमला नसेल तर ती रक्कम त्याच्या वारसदाराला मिळू शकेल व त्यासाठी त्याला दावापत्रक, वारसदारपत्र, मृत्यू दाखला हे बँकेत सादर करणे आवश्यक आहे. परंतु याची मर्यादा रु. १५ लाखापर्यंत आहे. पण रु. १५ लाखापेक्षा जास्त जमा असलेली रक्कम मिळविण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांना वारसा हक्क प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र वा प्रतिज्ञापत्र आणि त्या बरोबर योग्यत्या जामिनदाराचे, बंधपत्र (इन्डेमिनिटी बॉन्ड) बँकेत सादर करणे आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकांनी दि. ६ ऑगस्ट २०२५ च्या सभेच्या पतधोरणेमध्ये सुरक्षित ठेव लॉकरच्या

संबंधी सुध्दा सुटसुटीत नियम बँकांना आदेश स्वरूपात दिले आहेत. त्याची चर्चा पुढच्या अंकात आपण करूया. बँक ग्राहकांच्या दृष्टीने त्याच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी व त्याचे हित जोपसण्यासाठी बँकेचे गव्हर्नर श्री. संजय मल्होत्रा यांना बँकेना दिलेल्या वरील आदेशाबद्दल त्याचे अभिनंदन करावे तेवढे कमीच आहे. वरील नियमाची अंमलबजावणी दि. १ जानेवारी २०२६ पासून करण्यात येणार आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**– प्रभाकर कुलकर्णी**

कार्याध्यक्ष

## दैनंदिन जीवनात दासबोध समर्थांना अभिप्रेत ज्ञानयोग

**स.भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

मुख्य देवास जाणावे । सत्य स्वरुप वोळखावें । नित्यानित्य विचारावे । या नाव ज्ञान ।।२।। – श्रीमद दासबोध दशक ५ समास ६ आध्यात्मिक दृष्टीने ज्ञान म्हणजे आत्मा, परमात्मा आणि या जगाच्या सत्यस्वरूपाची जाणीव होय. आत्मा म्हणजे आपण शाश्वत, चैतन्य स्वरूप आहोत, हे ओळखणे म्हणजे ज्ञान. याउलट, शरीर, संबंध, मोह–माया आणि भौतिक जगालाच अंतिम सत्य मानणे हे अज्ञान होय. अज्ञानामुळेच माणूस जन्म–मरणाच्या फेरात अडकतो. शरीर, मन, बुद्धी हे सर्व नश्वर आहेत, आणि आत्मा हा अमर, शाश्वत व दिव्य आहे. या आत्म्याचं अंतिम लक्ष्य म्हणजे परमात्म्याशी एकरूप होणे, आणि हे केवळ ज्ञानानेच शक्य आहे. म्हणूनच भगवद्गीतेसारख्या ग्रंथांमध्ये वारंवार ज्ञान याचे महत्त्व सांगितले आहे. भगवद्गीतेच्या चौथ्या अध्यायात


**JV MARKETING & INVESTMENTS**

*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande*
*MBA - Marketing*

*+91 98330 25031*
*jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785*  *@jvmarketing18*  *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

श्रीकृष्णाने अर्जुनाला ज्ञानयोगाचे महत्त्व सांगितले आहे. ते म्हणतात, न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते – या जगात ज्ञानासारखे शुद्ध करणारे काही नाही. आत्मा अजर, अमर, अविनाशी आहे हे जेव्हा समजते तेव्हाच खरे ज्ञान प्राप्त होते. ज्ञानाने मोह, अज्ञान आणि अहंकार नष्ट होतात. ज्ञानेश्वरीत (४था अध्याय) ज्ञानयोग स्पष्ट करताना ज्ञानदेव सांगतात की, हे ज्ञान गुरुकृपेने आणि अंतःकरणाच्या शुद्धतेने प्राप्त होते. त्यांनी उदाहरण दिलं की, सूर्यप्रकाशाने अंध:कार नाहीसा होतो, तसेच आत्मज्ञानाने अज्ञान दूर होते. ज्ञानेश्वर माउली सांगतात की, कर्मातूनही ज्ञान मिळू शकते, परंतु हे कर्म निष्काम आणि भक्तिभावयुक्त असावे. दोन्ही ग्रंथांत ज्ञानयोगाचा अंतिम उद्देश आत्मसाक्षात्कार व परमेश्वरप्राप्ती सांगितलेला आहे. शोधितां आपले मूळ स्थान । सहजचि उडे अज्ञान । या नाव ब्रह्मज्ञान। मोक्षदायेक ।।१९।। – श्रीमद दासबोध दशक ५ समास ६ आपण आपल्या स्वरुपाचा शोध घेतला तर आपण आत्मरुप होतो व तेव्हा अज्ञान नष्ट होते. ज्ञान प्राप्त होण्यासाठी पुढील मार्गांचा अवलंब करावा. ज्ञान हे ध्यान, मनन, सत्संग, शास्त्रवाचन, गुरूचे मार्गदर्शन आणि स्वानुभव या सर्व माध्यमातून प्राप्त होते. हे ज्ञान मिळविण्यासाठी मनाची स्थिरता, वैराग्य, आणि विवेक आवश्यक असतो. ज्ञान मिळाल्यानंतर माणसाच्या दृष्टिकोनात अमूल्य बदल होतो. तो जीवनातील दुःख, मोह, क्रोध, लोभ यावर नियंत्रण ठेवू शकतो. तो कर्तव्य करत राहतो पण त्याच्याशी आसक्त राहत नाही. त्याचे मन अंतर्मुख होते आणि जीवन सुसंस्कृत, शुद्ध आणि शांत बनते. अहं ब्रह्मास्मि, सर्वं खल्विदं ब्रह्म, ही उपनिषदातील वचने म्हणजेच ज्ञानप्राप्त व्यक्तीची अनुभूती असते. ज्ञानयोग हा ज्ञानाच्या मार्गाने मुक्ती मिळवण्याचा शुद्ध मार्ग आहे. या मार्गात आत्मज्ञान मिळवण्यासाठी मन शुद्ध ठेवणे, विवेक विकसित करणे, इंद्रियांचे संयम राखणे, आणि मोक्षाची तीव्र इच्छा बाळगणे आवश्यक आहे. ज्ञानयोगी सर्वत्र परमात्म्याचे अस्तित्व अनुभवतो. तो कर्म करतो पण फळाची अपेक्षा ठेवत नाही. हळूहळू त्याचं मन अहंकार, दुःख, आसक्ती यांपासून दूर होतं आणि तो आत्मसाक्षात्काराच्या दिशेने वाटचाल करतो. अखेरीस तो ब्रह्मज्ञानात विलीन होतो आणि त्याला परमशांती प्राप्त होते. म्हणूनच अध्यात्मात ज्ञानाला सर्वोच्च साधन मानले गेले आहे, आणि अज्ञान हेच खरे बंधन मानले गेले आहे. ज्ञानाच्या प्रकाशातच खरी मुक्ती आणि परमेश्वरप्राप्ती शक्य होते.

## सलग्न संस्था वृत्त

* **मुंबई :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ दादर व अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे दि. २९ जुलै २०२५ रोजी सकाळी ८ वाजता मध्यवर्ती मंडळाच्या लक्ष्मी नारायण सभागृहात सामुहिक श्रावणीचा सोहळा मोठया उत्साहात पार पडला. श्री गणेश पूजा व ऋषी पुजन तर्पण आणि होम, नूतन यज्ञोपवित धारण विधी व ब्राह्मण पूजन विधी यथासांग पार पडल्या. दादर संघाचे पदाधिकारी तसेच मध्यवर्ती मंडळाचे पदाधिकारी यानी सहभाग नोंदविला. दि. २९ जुलै २०२५ रोजी संध्याकाळी महिला मेळावा देखील उत्साहात साजरा करण्यात आला.

**मुलुंड :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था, मुलुंड तर्फे प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही 'श्रावणी' चे आयोजन मंगळवार दिनांक २९-७-२०२५(नागपंचमी) रोजी सकाळी ७ वाजता करण्यात आले होते. श्री.अभय कुलकर्णी आणि त्यांचे सहकारी यांनी श्रावणी पूजा (यज्ञोपवित धारण) अतिशय उत्कृष्ट पणे संपन्न केली.या धार्मिक उपक्रमात ३४ जण सहभागी झाले होते. विशेष – 'श्रावणी' मध्ये २ बटू उपस्थित होते. प्रमुख विश्वस्त श्री. विजय वडगबाळकर यांनी सर्वांचे आभार मानले.

* **कल्याण** : श्रावणी वृत ब्राह्मण सभा, कल्याण, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण, अखिल भारतीय

ब्राह्मण महासंघ, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मंगळवार दिनांक २९ जुलै रोजी ब्राह्मण सभा, कल्याण सभागृहात एकुण एकोणपन्नास ब्रह्मवृंदांनी या श्रावणी कार्यक्रमात सहभाग नोंदविला, व श्रावणी संपन्न झाली. या कार्यक्रमाचे पौरोहित्य श्रीमान गोडसे गुरुजी व त्यांच्या सहकारी यांनी केले. या वेळी गोडसे गुरुजींनी श्रावणीचे महत्त्व विषद करुन हा धार्मिक हिंदु संस्कार टिकविणे अत्यंत गरजेचे आहे. या वेळी समस्त संस्थाच्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाची सांगता चहापान व अल्पोपहराने झाली.

* **डोंबिवली** : २०२५ ते २०२८ ह्या कालावधीसाठी त्रैवार्षिक निवडणुका नुकत्याच बिनविरोध पार पडलेल्या आहेत. ही निवडणूक प्रक्रिया, सुप्रसिद्ध कायदे तज्ञ आणि निवडणूक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव असलेले ॲडव्होकेट श्री रमेश कुलकर्णी यांनी अत्यंत काटेकोरपणे तसेच सुविहितपणे पार पाडली व या वर्षांकरिता निवडून आलेल्या नव्या कार्यकारिणीचा निकाल त्यांनी संस्थेच्या ३ मे २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर केला. कार्यकारिणीसाठी सात पदाधिकारी ,बारा सदस्य, तसेच दोन स्वीकृत सदस्य अशा २१ सदस्स्यांची बिनविरोध निवडण झाली. यावेळी पूर्वीच्या कार्यकारिणीमधील सात सदस्यांनी स्वेच्छेने संस्थेच्या जबाबदारीतून मोकळे होण्याचा मनोदय जाहीर केल्यामुळे सात नवीन तरुण-तरुणी नव्या कार्यकारिणीचे सदस्य होऊ शकले. तसेच विश्वस्त मंडळात देखील चार जणांनी स्वेच्छेने जबाबदारीतून मोकळे होण्याचा मनोदय जाहीर केल्यामुळे चार नवीन सभासदांची विश्वस्त मंडळात निवड करण्यात आली. विश्वस्त मंडळ विश्वस्त अध्यक्ष - नारायण राजाराम रत्नपारखी विश्वस्त कार्यवाह - अनुराधा अरविंद मोहिदेकर. सदस्य - विकास विश्वनाथ महाशब्दे. नरेश नागेश कुलकर्णी. कृष्ण गणेश चिंचणकर. कार्यकारी मंडळ पदाधिकारी जगन्नाथ कृष्णाजी जोशी. अध्यक्ष मानस सुरेश पिंगळे. उपाध्यक्ष प्रकाश भिमराव कुलकर्णी - कार्यवाह नीलिमा कृष्ण चिंचणकर सहकार्यवाह जयंत अविनाश कुलकर्णी- सहकार्यवाह धनंजय मोरेश्वर जोशी कोषाध्यक्ष संजीवनी शशिकांत कर्डेकर सहकोषाध्यक्ष सदस्य शुभदा नंदकुमार कुलकर्णी. सुधीर कृष्णराव ढोबळे. सीमा सिताराम संत. प्रकाश रामचंद्र उपाध्ये. प्रदीप रामचंद्र बाजी. गोविंद गजानन जोशी. नीरज दीपक देशपांडे. पल्लवी पंकज आंबेकर. विवेक सदाशिव वामोरकर. वृंदा विनायक मोहिदेकर. मिलिंद मोहन गुळवणे. महेश विलास अराणके. स्वीकृत सदस्य शिवकुमार प्रभाकर इनामदार. साधना शशांक लोहोकरे. संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये खालील नऊ वैधानिक समित्यांचेही गठन करण्यात आले. १) महिला समिती २) युवा समिती ३) त्रैमासिक समिती ४) वाढदिवस शुभेच्छा समिती ५) कार्यालयीन समिती ६) वधूवर सूचक समिती ७) मध्यवर्ती मंडळ समिती ८) ब्राह्मण महासंघ डोंबिवली ९) समिती संगणक समिती संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व नवीन विश्वस्तांचे तसेच कार्यकारिणी सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

* **पुणे** : आज मंगळवार दिनांक २९ जुलै २०२५ नागपंचमी निमित्त संस्थेमध्ये श्रावणी आयोजित करण्यात आली होती त्याला २५ ब्राह्मण उपस्थित होते तीन तास चाललेल्या श्रावणीच्या कार्यक्रमाला सर्वांनी उत्साहाने साथ दिली व पुढच्या वेळेस आणखीन मोठ्या संख्येने श्रावणीचा आयोजन करण्याचा प्रयत्न करू असा सगळ्यांनी संकल्प केला.

* **सोलापूर** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था आणि कै. एल.जी. काकडे एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पहिली ते उच्च पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या गरीब आणि होतकरू ८२ विद्यार्थ्यांना सुमारे सव्वा लाख रुपयांचे अर्थसहाय्य आणि शैक्षणिक साहित्याचे वितरण संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते झाले. यावेळी दहावी - बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला. येथील दत्त चौकातील संस्थेच्या समर्थ सभागृहात हा कार्यक्रम झाला. सुरुवातीला संस्थेच्या सहकार्यवाह डॉ. नभा काकडे यांच्या हस्ते समर्थांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष दत्ता

आराध्ये, विजय कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतीश पाटील, महिला अध्यक्ष हेमा चिंचोळकर युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, कार्यकारणी सदस्य रवींद्र तुळजापूरकर, शिरीष मंगरूळकर अमृता गोसावी, मंगेश महाजन यांच्यासह विद्यार्थी पालक उपस्थित होते. यावेळी डॉ. येळेगावकर यांनी विद्यार्थ्यांना करिअरबाबत जागृत राहून योग्य त्या शिक्षण प्रवाहाचा अवलंब करण्याचा आणि शिक्षणाद्वारे स्वतःसह कुटुंब आणि समाजाला भूषणावह काम करण्याचे आवाहन केले. यावेळी शैक्षणिक साहित्यासाठी देशभक्त कृ.भि. अंत्रोळीकर प्रतिष्ठान तर्फे अडीच हजार रुपये आणि कल्पना काकडे यांनी ५ हजार रुपयांची देणगी दिली. उपाध्यक्ष दत्ता आराध्ये यांनी सूत्रसंचालन केले तर कार्यवाह श्याम जोशी यांनी आभार मानले.

सोलापूर येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचा ९४ वा वर्धापनदिन आज दि.२ऑगस्ट रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते श्रीसंत समर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यवाह श्याम जोशी, उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, दत्तात्रय आराध्ये, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, संजय कुलकर्णी, महिला शाखेच्या स्मिता देशपांडे आदि उपस्थित होते. अध्यक्ष डॉ. येळेगावकर यांनी १९३१ मध्ये गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य व शैक्षणिक साहित्य देण्यासाठी समाजातील तत्कालीन मान्यवरांनी संस्थेची स्थापना केल्याची माहिती देत,सध्याचे उपक्रम सांगितले. यावेळी सर्वांना पेढे वाटून आनंदोत्सव करण्यात आला.

✻ **छत्रपती संभाजी नगर** : दरवर्षी प्रमाणे याही वर्षी देऋब्रा. मंडळातर्फे दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आयोजित करण्यात आला. होता यावेळेस कार्यक्रमाचे अध्यक्ष महेंद्र (भैय्या ) गंधे अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबई, प्रमुख पाहुणे म्हणून सौ मुग्धा जेहूरकर व सुशांत देशपांडे (विभागीय उपव्यवस्थापक अमृत संस्था, महाराष्ट्र राज्य) यांची उपस्थिती लाभली. यावेळेस जवळजवळ २००विद्यार्थ्यांचा गुणगौरव मंडळातर्फे करण्यात आला १२० विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती फॉर्म भरून घेण्यात आले, ही शिष्यवृत्ती अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबई यांच्याकडून दरवर्षी देण्यात येते, यावेळेस माननीय सुशांत देशपांडे यांनी अमृत संस्था, महाराष्ट्र राज्य याची माहिती सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. सुशांत सर यांनी विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाचे कौतुक केले. मुग्धा जेऊरकर यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात कसे करिअर निवडावे याचे मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे भैय्या गंधे यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. यावेळेस कार्यक्रमाचे सूत्रसंचालनरवीना कन्नडकर यांनी केले. आभार प्रदर्शन मयुरी दाभाडकर यांनी केले. यावेळेस या उपक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष नरेश जोशी, महिला अध्यक्ष मोनिकाताई चौधरी, उपाध्यक्ष रवीजी जेहूरकर कोषाध्यक्ष अंबादास कुलकर्णी, सचिव प्रशांत दाभाडकर सहसचिव अमोल पांडव, मयुरी दाभाडकर, वैभव देशपांडे, श्रीपाद मुगुटे, गोपाळ कुलकर्णी , नरेश पटवर्धन, विभा देशपांडे,रूपाली कुलकर्णी, सौ कल्पना जोशी योगिनी देशमुख, समृद्धी चौधरी यांनी उपक्रमासाठी अथक परिश्रम घेतले व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.

✻ **कराड** : आपला गुणवंत विद्यार्थी पुरस्कार वितरण समारंभ खूपच सुंदर आणि दिमाखदार झाला...!! अक्षय पात्र हॉलमध्ये पाऊल ठेवता क्षणी आपले कार्यकारणी सदस्य श्री संभाजी कुलकर्णी यांची दिल खेचक रांगोळी नेहमीप्रमाणेच सर्वांचे आकर्षण ठरत होती..!! कार्यक्रमाची सुरुवात श्री गोविंद घळसासी गुरुजी आणि त्यांचे सहकारी यांच्या मंत्र जागराने झाली. त्यामुळे अतिशय मंगलमय वातावरण तयार झाले. त्यानंतर श्री नितीन भाऊ शाळीग्राम यांनी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कराड या आपल्या संस्थेची माहिती व कार्य प्रणाली तसेच त्यांचे कार्यक्रमाविषयीचे मनोगत व्यक्त केले..!! त्यानंतर श्री रमेश काका कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री प्रभाकर जोशी सर यांची ओळख व त्यांचा थोडक्यात जीवन प्रवास कथन केला...!! आपल्या

संघाचे ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य व माजी अध्यक्ष श्री नंदकुमार अष्टेकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले व सत्कार केला तसेच आपले दुसरे जेष्ठ कार्यकारणी सदस्य श्री. वसंतराव जोशी काका यांनी कराड मधील सर्वात ज्येष्ठ सीए श्री पी एल कुलकर्णी सर यांचा सत्कार केला..!! सत्कार सोहळ्यानंतर प्रमुख पाहुणे यांचे अतिशय सुंदर व अभ्यासपूर्ण असे भाषण झाले. सदर भाषण हे संपूर्णपणे विद्यार्थ्यांना उद्बोधन करणारे होते. सरांची भाषाशैली मनाला अतिशय भावणारी अशी होती त्यामुळे वेळ कसा गेला ते कळलेच नाही..!! प्रमुख पाहुण्यांच्या भाषणानंतर सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार झाले आणि त्यानंतर कार्यक्रमाची सांगता सौ वैद्य काकू व सौ जाखलेकर मॅडम यांनी कल्याण करी रामराया या भक्ती कवनाने केली..!! संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ कित्तूर मॅडम यांनी अतिशय प्रभावीपणे केले..!! आपल्या संघाच्या अध्यक्षा श्रुती कुलकर्णी मॅडम यांना घरगुती अडचण आल्या मुळे त्या कार्यक्रमास उपस्थित राहू शकल्या नाहीत. तसेच नेहमीचे आमचे खंदे कार्यकर्ते श्री. प्रसाद जोशी श्री अभिजीत इनामदार श्री मनोज आचार्य व सौ कलेढोणकर मॅडम या सर्वांची अनुपस्थिती जाणवली..!! हा आपला आनंद सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री अष्टेकर काका श्री जोशी काका श्री नितीन भाऊ शाळीग्राम श्री सुनील पोतनीस श्री रमेश काका कुलकर्णी श्री रघुवीर कुलकर्णी श्री धनंजय कुलकर्णी श्री रुपेश दळवी श्री मंदार जोशी श्री विजय वाळवडे श्री गोविंद घळसासी श्री संभाजी कुलकर्णी श्री नंदू काळे श्री भाऊ भिंगारे श्री मिलिंद बक्षी तसेच महिलांच्या मध्ये सौ कित्तूर मॅडम सौ वैद्य काकू सौ जोशी काकू, सौ जाखलेकर मॅडम सौ योगिनी डोईफोडे मॅडम आणि इतर बरेच उत्साही सदस्य यांनी हिरीरीने भाग घेतला व आपले योगदान दिले..!! या आपल्या कार्यक्रमास बहुसंख्येने आपल्या सदस्यांनी विद्यार्थ्यांनी व त्यांचे पालकांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाची सांगता भोजनाने झाल्यामुळे सर्वांच्या चेहऱ्यावर नैसर्गिक तृप्तीचा आनंद दिसत होता. एकंदरीतच कार्यक्रम खूपच चांगला झाल्यामुळे सर्वांनी कार्यक्रमाची प्रशंसा केली


**JAYANT DESHMUKH**
B.COM., CAIIB DBM

**Dr. AMIT DESHMUKH**
*Assistant Professor* B.Com., MA., Ph.D.

• Authorised Insurance Advisor • Investment Consultant
• Mediclaim • AMFI Registered Mutual Fund Partner

M. : 9930445721 / 9702837022 deshisbijayant@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

◎ Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
◎ Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance
◎ Trustee & Treasurer - Balaji Mandir Trust, Kalyan
◎ President - Karnataka Sangha, Kalyan
◎ Past Vice President - Andhra Association, Kalyan
◎ Past Manager - State Bank of India
◎ Housing Loan Provider
◎ Member - BBNG Kalyan
◎ Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
◎ Joint Treasurer - DRBS Kalyan

◎ Certified Astrologer
◎ Meditation
◎ Palmist
◎ Yoga
◎ Numerologist
◎ Vastu
◎ Bhakti Shastri
◎ Cyber Crime Investigator

नवीन बऱ्याच जणांनी सभासदाचे फॉर्म नेले. काहीजण लगेचच सभासद झाले. कार्यक्रमाची उत्साही आनंदी आणि प्रशंसा करणारी पोहोच पावती जागेवर लगेचच मिळाल्यामुळे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना खूपच बळ मिळते..!! अशी कालची खूपच छान आणि आनंद देणारी संध्याकाळ कायमची स्मरणात राहील हे नक्की..!!

*** अकोला** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, अकोलातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा रविवार दिनांक १४ जुलै २०२५ रोजी दुपारी ४.००वा. संपन्न झाला ह्या सोहळयासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबईचे अध्यक्ष श्री. महेंद्र (भैय्यासाहेब) गंधे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून येथील डॉ. संदीप तारे हे लाभले, तसेच प्रमुख अतिथी म्हणून मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकरपंत कुलकर्णी व श्री. मिलिंद सरदेशमुख कार्यवाह व प्रा. पुराणिक, जळगांव हे लाभले. कार्यक्रमाची सुरूवात श्री. महेंद्र (भैय्यासाहेब) गंधे, डॉ. संदिप तारे, श्री. मिलिंद सरदेशमुख, प्रा. पुराणिक, जळगांव तसेच मंडळाचे सचिव श्री अनय घोटीकर, संयोजक श्री संजय देशमुख यांच्याहस्ते दिप प्रज्वलन व सरस्वती पूजन करून करण्यात आले. प्रमुख पाहुणे श्री. महेंद्र (भैय्यासाहेब) गंधे यांचे स्वागत डॉ. महाशब्दे यांनी तर डॉ. संदिप तारे यांचे स्वागत श्री अनय घोटीकर यांनी केले. श्री प्रभाकरपंत कुलकर्णी यांचे स्वागत श्री संजय जोशी यांच्या हस्ते तर श्री पुराणिक व श्री मोतीसिंहजी मोहता यांचे स्वागत श्री गणेश मैराळ यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, अकोल्याचे अध्यक्ष श्री हरी. शं. महाशब्दे यांनी केले. प्रमुख पाहुण्याचा परिचय सौ. सिमा जयंत सरदेशपांडे व सौ. संजीवनी कुलकर्णी यांनी केला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना भरपुर मेहनत करून यश कसे मिळवायचे याबद्दल मार्गदर्शन केले. यानंतर गुणगौरव सोहळयाबाबत सौ. मंजुषा अनय घोटीकर यांनी माहिती दिली व नंतर सर्व गुणवंतांचा गौरव त्यांना मिळालेले बक्षिस तसेच भेट वस्तु देऊन करण्यात आले. यावेळी सर्वात जास्त बक्षीसे रेवा मुळे हीने १०वीत सर्वात जास्त गुण ४९४ प्राप्त केल्यामुळे मिळविले. एकूण इयत्ता ४थी, ५वी, ८वी, १०वी, १२वी, ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट असे सर्वमिळून एकूण १३० विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच पुरस्कृत रोख रक्कम व मंडळातर्फे भेट वस्तु, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच कला/ क्रिडा प्रज्ञाशोध परिक्षांमध्ये सुध्दा विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे सचिव श्री अनय घोटीकर, कोषाध्यक्ष अविनाश देशपांडे, सहसचिव जयंत सरदेशपांडे व संजय जोशी, सदस्य श्री नाना कुलकर्णी, श्री संजीवजी घडयाळजी, श्री संजय देशमुख, श्री दिनेश देशपांडे, श्री प्रदिप वांगीकर, श्री गणेश मैराळ, श्री राम उमरेकर, महिला मंडळाच्या सौ. मंजुषा घोटीकर, सौ. जयश्री वांगीकर, सौ. मृणाल कुलकर्णी, सौ. शुभांगी कुलकर्णी, सौ. श्रध्दा संत, सौ. ज्योती जोशी, सौ. संजीवनी कुलकर्णी, सौ. सिमा सरदेशपांडे, सौ. मेधा देशमुख, सौ. अवंतीका मैराळ, व सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप सौ. अवंतिका मैराळ यांच्या पसायदानाने झाला.

## त्रिवार अभिनंदन

### समाजभूषण अरविंद्र नरेंद्र देशपांडे

श्री. अरविंद्र नरेंद्र देशपांडे यांचा जन्म ९ सप्टेंबर १९५९ रोजी राशीवडे कोल्हापूर येथे झाला. आयुर्वेद्य वैद्यविशारद नाटय प्रशिक्षण, सहकार प्रशिक्षण आदि विषयात शिक्षण घेतले. कोल्हापूरातील एस.एम.टी.टी. कॉलेजमध्ये बी.एड आणि मिलिंद हायस्कूलमध्ये मुख्याध्यापक म्हणून सुरूवात. १९९२मध्ये सांगलीतील

श्रीमती पुतळा बेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये समन्वयक पंदावर नियुक्ती. राष्ट्रीय स्तरावर व्यवसायिक, शिक्षण, महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी बडोदामध्ये प्राध्यापक म्हणून काम पाहिले. सातत्याने विविध शैक्षणिक मासिकात त्यांचे लेखन प्रसिद्ध आहे. आकाशवाणी, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, उस्मानाबाद या केंद्रा बरोबर ९१.९वर विशेष कार्यक्रमांचे आयोजन सृष्टी मित्र विचार दर्शन, बोधतंरग, सृजनांची स्वप्ने जागवताना अशी विविध पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत.



राष्ट्रीय शिक्षण भूषण, आदर्श पालक, साने गुरूजी, आदर्श शिक्षक पुरस्कार आणि जीवनगौरव पुरस्काराने सन्मानीत नरेंद्र विद्यापीठ संस्था कोल्हापूर या संस्थेचे संस्थापक सदस्य म्हणूनही काम पाहिले. महाराष्ट्र राज्य समन्वय संघटना या संस्थेचे अध्यक्ष मराठी साहित्य परिषदेचे सदस्य म्हणूनही काम पाहिले आहे. शाहू ब्लड बँक कोल्हापूर या संस्थेतर्फे रक्तदानाबद्दल आणि देहदान संकल्प, पर्यावरण जाणीव जागृती, कार्यासाठी विशेष सत्कार करण्यात आले आहेत. स्वर्गीय न. ना. देशपांडे उत्कृष्ट काव्य संग्रह पुरस्कार गृहिणी गौरव पुरस्कार, ज्येष्ठ स्वातंष्य सैनिक न. वा. जोशी सेवा गौरव पुरस्कार, स्व.भाऊ साहेब देशपांडे उद्योग पुरस्कार अशा विविध पुरस्कारांचे संयोजन ही करण्यात आले आहे. अशा विविधांगी सार्वजनिक कार्याचा स्पर्श असलेल्या श्री. अरविंद्र नरेंद्र देशपांडे यांना मानाचा मुजरा. असेच समाजकार्य आपल्या हातून घडो, अशी समर्थ चरणी प्रार्थना. ज्ञातीतील श्री. अरविंद्र नरेंद्र देशपांडे यांना अखिल देशस्थ ऋग्वेदी मध्यवर्ती मंडळातर्फे अनेक शुभेच्छा.

## दिव्या देशमुख



नागपूरच्या १९वर्षीय दिव्या देशमुखने इतिहास घडवला आहे. तिने जॉर्जियातील बातुमी येथे पार पडलेल्या बुध्दिबळ विश्वचषक स्पर्धेत अंतिम फेरीत भारताच्या कोनेरू हम्पीला पराभूत करत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. तिने एफ.आय.डी.ई विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्यात कोनेरू हम्पीवर टायब्रेकर फेरीत विजय मिळवत भारताची पहिली महिला विश्वविजेती होण्याचा मान पटकावला. २०२५मध्ये ती दूरस्थ शिक्षणाद्वारे ऑनलाईन तिचे उच्च शिक्षण पूर्ण करत आहे. दरम्यान, गेल्या वर्षी दिव्याने जागतिक ज्युनियर स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले होते. तसेच भारतीय महिला संघाने पुरूषांबरोबरच बुध्दिबळ ऑलिम्पियाडमध्ये ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकले, त्या विजयात दिव्याचेही अमूल्य योगदान राहिले. दिव्या देशमुख यांचे अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

## श्रीमान दीपक अविनाश कुलकर्णी



सर्वांना कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, आपल्या मध्यवर्ती मंडळाचे व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, डोंबिवली संस्थेचे तरूण सदस्य श्रीमान दीपक अविनाश कुलकर्णी यांनी ISBM विद्यापीठ छतीसगड मधून इलेक्ट्रॉनिक्स या विषयात डॉक्टरेट Ph.D पदवी यशस्वीरीत्या पूर्ण केले. दिनांक २७ जुलै२०२५ रोजी डॉक्टरेट अवॉर्ड झाली. त्यांनी Design and Development of Automated Predicting and Preventing Time System for Health Monitoring Transformer at distribution End. या विषयावर केंद्रीत होते. हे संशोधन ४ वर्षात पूर्ण केले. अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्य परिवाराकडून समस्त कुलकर्णी परिवाराचे हार्दिक अभिनंदन व त्यांस पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे ....................................................................................**

*** वेदप्रकाश (विनीत) सदाशिव पानसे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २३/०६/१९७९, **जन्म वेळ :** सायंकाळी ५.१०, **जन्म ठिकाण :** सातारा, **उंची :** ५.८, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** मुद्गल, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** मृग, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. कॉम जी डी सी ए, **नोकरी/ व्यवसाय :** सरकारी, **वार्षिक उत्पन्न :** १५लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९३२१०७४६००/९५४५५१७१४९

*** मयुरेश मनोहर परळीकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २३/१०/१९८५, **जन्म वेळ :** रात्री ८.४०, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** जमदग्नी, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** शततारका, **नाडी :** आद्य, **गण:** राक्षस, **शिक्षण :** बी. इ.एम बी ए, **नोकरी/ व्यवसाय :** टी सी एस मुंबई, **वार्षिक उत्पन्न :** १५.६५लाख, **अपेक्षा :** अनुरूप नोकरी असणारी, **संपर्क :** ९८९२६८६१६३/९८६७७८४७२४

*** शार्दूल प्रमोद टाकळकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/०३/१९८६, **जन्म वेळ :** दुपारी १.०५, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** हरितस , **रास :** कन्या, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** पदवीधर बी एस सी आयटी, **नोकरी/ व्यवसाय :** इन्फोसिस (डेन्व्हर, अमेरिका), **वार्षिक उत्पन्न :** डॉलर, **अपेक्षा :** परदेशी राहू शकणारी, संसाराची आवड, सुसंस्कृत, धार्मिक कार्यात सहभाग आवडाणारी, शाकाहारी, **संपर्क :** ७२०६४३६८८६/९८६९९५०६९९

*** निनाद तुषार नाईक (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/१२/१९९१, **जन्म वेळ :** दुपारी ३.४७, **जन्म ठिकाण :** दादर, **उंची :** ६, **रक्तगट :** बी आरएच (+), **गोत्र :** विश्वामित्र, **रास :** कन्या, **नक्षत्र :** आश्लेशा, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य **शिक्षण :** बी. इ. (इलेक्ट्रीकल), **नोकरी/ व्यवसाय :** Airoli, **वार्षिक उत्पन्न :** १०लाख, **अपेक्षा :** सुसंस्कृत, साधी, ग्रॅज्युएट, नोकरी असेल तर ठीक पण नोकरीची सक्ती नाही, **संपर्क :** ९७३०८८६००१/ ९८६७६६१६०३

*** निर्मल नितीन वाळुंजकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०४/१२/१९९४, **जन्म वेळ :** पहाटे ६.३७, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** कौशिक, **रास :** धनु, **नक्षत्र :** मुळा, **नाडी :** आद्य, **गण:** राक्षस, **शिक्षण :** बी. इ, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** १० ते १५ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८८६९२०६१४३

*** भूषण प्रमोद वामनचार्य (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १३/०७/१९९५, **जन्म वेळ :** रात्री १२.१८, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.८, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** गौतम, **रास :** मकर, **नक्षत्र :** उत्तराषाढा, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. कॉम, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ९ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८६७५०३८५०

*** प्रसाद मिलिंद कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १४/०४/१९९५, **जन्म वेळ :** सायंकाळी ५.५७, **जन्म ठिकाण :** दादर, **उंची :** ५.९, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** कन्या, **नक्षत्र :** हस्त, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. इ., **नोकरी/ व्यवसाय :** बिजनेस सिनियर इंजिनिअर, **वार्षिक उत्पन्न :** ६लाख, **अपेक्षा :** सुसंस्कृत, साधी, ग्रॅज्युएट, नोकरी असेल तर ठीक पण नोकरीची सक्ती नाही, **संपर्क :** ८३५६९६७४५८/ ९३२२२८५७२३

*** संकेत नितीन जोशी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/०२/१९९६, **जन्म वेळ :** दुपारी ५.२५, **जन्म ठिकाण :** नाशिक, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** मृग, **नाडी :** मध्य, **गण :**

देव, **शिक्षण :** बी. ई. इलेक्ट-ॉनिक्स, **नोकरी/ व्यवसाय :** सिनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर, अमडॉक्स, पुणे, **वार्षिक उत्पन्न :** १३.५०लाख, **अपेक्षा :** सुस्वरूप, नोकरी करणारी, आयटी क्षेत्रात इंजिनीयर असावी, शक्यतो देशस्थ ऋग्वेदी असावी, पत्रिका, **संपर्क :** ९८७०३३९८२४/९८७०३३९८२५

**※ हेमंत गोविंद जोशी (देशस्थ याजूर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १०/०६/१९९६, **जन्म वेळ :** रात्री ८.४, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.११, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** वत्स, **रास :** मेष, **नक्षत्र :** पुष्य, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. इ., **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी (पुणे), **वार्षिक उत्पन्न :** १०लाख ६५हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क:** ९८९२२४६२९३/९९६७६९१८१६

**※ अमोघ राजन देशपांडे (देशस्थ याजूर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/०२/१९९१, **जन्म वेळ :** संध्याकाळी ७.५७, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.११, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** कर्क, **नक्षत्र :** पुनर्वसु, **नाडी:** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** BE (Graphical Media) ME (Audio Programming) SPL (Audio designing), **नोकरी/ व्यवसाय :** Zee Studio, **वार्षिक उत्पन्न :** ६लाख, **अपेक्षा :** अनुरूप, शाखाभेद चालेल, सस्वभावी, मनमिळाऊ, नोकरी असल्यास चालेल, **संपर्क :** ९८६७८९७९६४

**※ सुबोध मकरंद दातार (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** ३०/१०/१९९६, **जन्म वेळ :** सायंकाळी ५.२४, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** वशिष्ट, **रास :** मिथुन, **नक्षत्र :** मृग, **नाडी :** मध्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. कॉम, एम बी ए, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी (ऐरोली), **वार्षिक उत्पन्न :** ८लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९९६९६५१९०२/९८६९५१२६५८

**※ तन्मय श्रीनिवास काळे (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** १६/११/१९९८, **जन्म वेळ :** रात्री ८.३६, **जन्म ठिकाण :** घाटकोपर, **उंची :** ५.२, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** वत्स, **रास :** तुळ, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. टेक, **नोकरी/ व्यवसाय :** नोकरी, **वार्षिक उत्पन्न :** १० लाख, **अपेक्षा :** सुसंस्कृत,सुशिक्षित, मनमिळाऊ, **संपर्क :** ९५९४०२२२८८/९५९४०२२२७७

**※ प्रसाद दीपक देढे (देशस्थ यजूर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १८/०६/१९९८, **जन्म वेळ :** दुपारी २.०८, **जन्म ठिकाण :** अकोला, **उंची :** ५.१०, **रक्तगट :** एबी (.), **गोत्र :** वत्स, **रास :** मीन, **नक्षत्र :** उत्तर भाद्रपदा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. टेक, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** १२ ते १४ लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ८४२२०९१८९८/९०८२१९२१४१

**वर पाहिजे ........................................................................................**

**※ अदिती दिलीप कर्डेकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०४/१२/१९८९, **जन्म वेळ :** सायंकाळी ७.२०, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.७, **गोत्र :** भारव्दाज, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** धनिष्ठा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** M.Com. ICWA, CPL, MCA, **नोकरी/ व्यवसाय :** यू एस ए, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८९२२६२६५५/ ९७६९३९५६७२

**डॉ. अंकिता अ. राव (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १३/०४/१९९४, **जन्म वेळ :** सकाळी ६.४५, **जन्म ठिकाण :** माटुंगा (मुंबई), **उंची :** ५.२, **रक्तगट :** ओ (-) , **गोत्र :** भारव्दाज, **रास :** मेष, **नक्षत्र :** भरणी, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** MBBS. Will appear for Final year exam for MD (Pharmacology), **नोकरी/ व्यवसाय :** Junior Resident Doctor at TNMC & BYL Charitable Hospital, **वार्षिक उत्पन्न :** १० लाख, **अपेक्षा :** Masters & Above in any field. Preferably in Mumbai & then Pune, Bangalore & Abroad. (Specify City Also), **संपर्क :** ९३२३६८००३८/९६६५९८००३८

* **सृष्टी दिपक कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २१/०६/२०००, **जन्म वेळ :** मध्यरात्री १.००, **जन्म ठिकाण :** यवतमाळ, **उंची :** ५, **रक्तगट : ओ (+), गोत्र :** काश्यप, **रास :** मकर, **नक्षत्र :** श्रवण, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** B.E. (Computer Engg.) Diploma in UI/UX, **नोकरी/ व्यवसाय :** पुणे, **वार्षिक उत्पन्न :** ७ लाख ८२ हजार, **अपेक्षा :** पुणे- मुंबई / आयटी इंजीनियरिंग / बँकिंग प्रथम प्राधान्य, २-३ वर्ष वयात अंतर, निर्व्यसनी, शाकाहारी, देशस्थ ऋग्वेदी / देशस्थ यजुर्वेदी, कोकणस्थ, **संपर्क :** ९१६७९२३३७८/८८७९८०४२५९
* **गौरी मनोज बक्षी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०१/०८/२००१, **जन्म वेळ :** दुपारी ४.०५, **जन्म ठिकाण :** जुनी सांगवी, **उंची :** ५.५, **रक्तगट : एबइ** (.), **गोत्र :** भारव्दाज, **रास :** धनु, **नक्षत्र :** पूर्वशाढा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** B.E. Computer, **नोकरी/ व्यवसाय :** TATA Consultancy Services, **वार्षिक उत्पन्न:** ७ लाख ३७ हजार, **अपेक्षा :** शिक्षित, नोकरदार, समजूतदार, काळजी घेणारी, **संपर्क :** ९३२०१९६७८८
* **श्वेता धनंजय कुलकर्णी (देशस्थ यजूर्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १७/०६/१९९९, **जन्म वेळ :** सायंकाळी ६.३०, **जन्म ठिकाण :** अंबरनाथ, **उंची :** ५.६, **रक्तगट : ए** (+), **गोत्र :** भार्गव, **रास :** कर्क, **नक्षत्र :** आश्लेषा, **नाडी:** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** Diploma in Electronics & Telecommunications, Certificate Course in Industrial Automation, Course in Advanced Embedded Tech, Course in AUTO – CAD 2D &3D (Electrical), **नोकरी/ व्यवसाय :** नाही, **अपेक्षा :** शाकाहारी, अनुरूप, निर्व्यसनी, **संपर्क :** ८१४९३६०६४४/८६००४३६४३४

**(घटस्फोटित / पुर्नविवाह)**

**वधू पाहिजे** ........................................................................

* **सचिन मुरलीधर दीक्षित (विधूर) (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०९/०७/१९७३, **जन्म वेळ :** मध्यरात्री ४.४०, **जन्म ठिकाण :** ओझर टाऊनशिप नाशिक, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** वशिष्ठ, **रास :** तूळ, **नक्षत्र :** स्वाती, **नाडी :** अंत्य, **गण : देव, शिक्षण :** बीएससी केमिस्ट्री, **नोकरी/ व्यवसाय :** शेती आणि नोकरी, **वार्षिक उत्पन्न :** ९लाख, **अपेक्षा :** विधवा किंवा घटस्फोटीत दोन्ही मुलांना सांभाळून घेणारी समजूतदार, सुस्वाभावी असावी, **संपर्क :** ८६६८५३६५५६

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वत:ची राहील)**

## कृतज्ञता देणगी

संगीत क्षेत्रात तीन-चार दशके कार्यरत असणाऱ्या सौ शशिकला उदय नांदेडकर राहणार कळवा, ठाणे यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी मध्यवर्ती मंडळाच्या शैक्षणिक कार्यास रुपये पाच हजाराची देणगी मध्यवर्ती मंडळाचे कार्यवाह श्री मिलिंद सरदेशमुख यांच्याकडे सुपूर्द केली.

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे सौ शशिकला उदय नांदेडकर यांचे अभिनंदन.

## भावपूर्ण श्रद्धांजली

देशस्थ ऋग्वेदी मंडळाचे कार्यकर्ते श्री. सुधाकर हरी कुलकर्णी यांचे नुकतेच पुणे येथे राहत्या घरी दुःखद निधन झाले. मृत्यू समयी ते ८३ वर्षाचे होते. देशस्थ ऋग्वेदी मंडळाचे काम करताना, त्यांनी समाजात जे ज्या व्यक्ती देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण आहेत, त्या सर्वांना देशस्थ ऋग्वेदी मंडळ मुंबई तसेच नाशिक या दोन संस्थांचे सभासद करून घेतले. तसेच, पुण्यातील संस्थेमध्ये व मुंबईतील संस्थेमध्ये त्यांचा कामकाजात सक्रिय सहभाग होता. देशस्थ ऋग्वेदी संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

# श्रावणोत्सव

**संगीता कुलकर्णी (मो. : ९८७०४५१०२०)**

निसर्गचक्र आणि परंपरा या दोन्ही दृष्टीने श्रावणाला महत्त्व आहे. चार्तुमासातील श्रेष्ठ महिना म्हणून श्रावणाचे वर्णन केले जाते. आषाढी अमावस्या दीपपूजन तथा दिव्याची आवस झाली की व्रतवैकल्यांना सुरुवात होते आणि वातावरणही बदलते. ऊन-पावसाचा खेळ सुरू होतो. देवाच्या हातानं खाली येणाऱ्या माणिक मोत्यांचं' हिरवं स्वप्न फुलू लागतं. धरतीच्या कणाकणातून चैतन्य पाझरताना दिसतं तर दुसरीकडे केवळ हिरव्या भाज्यांवर महिना काढावा लागणार म्हणून खवय्यांपुढे जणू समस्या उभी राहते. खरा आनंद पाहायला मिळतो तो नुकतेच लग्न झालेल्या मुलीच्या डोळ्यात. माहेरचा पहिला सण किंवा सासरी आलेल्या भावाची भेट ही कल्पनाच तिला मोहरून टाकते. दारापाशी तिच्या येरझऱ्या जणू सण श्रावणाचा आला आठवे माहेरचा झुला कधी येशील बंधुराया नको लावू वाट बघाया या तिच्या भावना व्यक्त करीत असतात आणि इकडे व्रताची तयारी सुरू झालेली असते. श्रावण महिना सण-उत्सवाचा महिना म्हणून ओळखला जातो. महिलांसाठी तर श्रावण महिना खासच..विशेषत: नवविवाहितांच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत असतो. महिन्याभराच्या या आनंदोत्सवाची सुरूवात होते ती शिवामूठच्या व्रताने. दर सोमवारी तांदूळ, तीळ, मूग, जव आणि सातू अशा क्रमाने शंकराच्या पिंडीवर मुठीने धान्य वाहतात. नवविवाहीत महिलांनी पाच वर्षापर्यंत हे व्रत करण्याची परंपरा आहे. सोमवार सारखाच मंगळवारही महिलांसाठी विशेष. नववधूसाठी तर खासच. संसारातील सौख्य-प्रेम कायम राहावं या भावनेनं या दिवशी मंगळागौरीचं व्रत करतात. पहिल्या मंगळागौरीच्या व्रताला परिसरातील महिलांना आमंत्रण द्यायचं मंगळागौरीची पूजा, त्यानंतर ओव्या..उखाणे. हळदकुंकू...ओटी भरणं...रात्री जागरण आणि पारंपरिक खेळ...त्यानिमित्ताने माहेर आणि सासर दोन्हीकडचं प्रेम अनुभवायला मिळतं. हा मराठमोळा पारंपरिक वेशभूषेतला महिलांचा समूह श्रावणातल्या सप्तरंगी आणि आनंदमयी वातावरणाचं जणू काही प्रतिनिधीत्वच करतो आहे. शुक्ल पक्षातील पंचमीला नागपंचमीचा सण येतो. तो शेतकऱ्यांचा मित्र म्हणून त्याची पूजा करतात. त्याला इजा होऊ नये म्हणून या दिवशी जमीन खणत नाही किंवा नांगर चालविला जात नाही. वारुळाला जावून नागाचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. मुंबई सारख्या ठिकाणी शक्य नाही म्हणून मातीचा नाग आणून त्याची पूजा केली जाते. या दिवसाला 'झोकापंचमी' म्हणूनही संबोधतात...नागपूजनाच्या निमित्ताने मोकळ्या निसर्गात जाणे प्रकृतीसाठी चांगले असते आणि पूजा झाल्यानंतर झिम्मा, फुगडी आणि वडाच्या पारंब्यावरचे झोके हे खेळ खेळतात. हा सण शेतीप्रधान संस्कृतीचे द्योतक असल्याने नागाचे महत्त्व लक्षात घेऊन अंधश्रद्धांना बळी न पडता या सणाची खरी पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे. तसेच बदलत्या परिस्थितीत नागपंचमीचे व्रत करतांना नागाचे रक्षण करण्याचे प्रयत्न करण्याची गरज आहे. शुक्ल पक्षातील पौर्णिमा 'नारळी पौर्णिमा' म्हणून ओळखली जाते. समुद्र किनारी राहणाऱ्या कोळी बांधवांसाठी हा खास सण. ज्याच्यावर संपूर्ण कुटुंबाचे जीवन अवलंबून आहे अशा 'समिंदराला' म्हणजेच समुद्राला या दिवशी प्रेमाने नारळ अर्पण केला जातो. रंगबेरंगी पारंपारिक पोशाखाने समुद्र किनारा फुलतो. नारळ अर्पण करून नव्या मोसमासाठी होडी समुद्रात सोडण्याची प्रथा आहे...या दिवसाचे आणखी एक खास महत्त्व आहे. भारतीय संस्कृतीत भाऊ बहिणीच्या नात्याचं असलेलं महत्त्व अधोरेखित करणारा हा दिवस. या सणाच्या निमित्ताने सीमेवर लढणारे सैनिक, अंधशाळा तसेच अनाथालयातील मुले मनोरुग्णालयातील रुग्ण, जेलमधील कैदी बांधव आदींना राखी बांधून सामाजिक ऋणानुबंध जोडण्याचे चांगले प्रयत्न या सणाच्या निमित्ताने करता येतात. शिळसप्तमीची अग्नीदेवाची आणि सप्तर्षींची आंब्याच्या रोपाने पूजा झाली की 'गोविंदा आला रे आला चा जल्लोष सुरू होतो. श्रावण वद्य अष्टमीला श्रीकृष्ण जन्माच्या पुढच्या दिवशी गोकुळ अष्टमी येते. दहीहंडीची धमाल आणि बच्चेकंपनीला तसेच मोठ्यांनाही दहीकाल्याच्या प्रसादाची चंगळ बरं. त्यात गोविंदा पथकाचा पराक्रम. त्यात पावसाची सर आली तर आनंदाला नुसते उधाण येते. महिला मंडळांचे गोविंदा पथकही महानगरात मनोरे रचून दहीहंडी फोडतांना आपल्याला दिसतात. काळानुसार उत्सवाचे स्वरूप व्यापक होत असले तरी सांस्कृतिक गाभ्याला धक्का लागणार नाही याची काळजी मात्र सर्वांनीच घ्यायला हवी. श्रावणाला निरोप देताना येते पिठोरी अमावस्या. आईच्या हाताचं वाण घेतानाचा दिवस. पाठचा भाऊ आणि पोटचा मुलगा यांच्या रक्षणासाठी महिला हे व्रत करतात. पोळा - शेतकऱ्यांसाठी हा सण महत्त्वाचा असतो. त्याच्या कुटुंबाचा घटक म्हणून त्याचे मित्र म्हणून सहकारी म्हणून वावरणाऱ्या जिवा-शिवाच्या बैलजोडीला विश्रांती देण्याचा दिवस व त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. बैलांना आंघोळ घालायची, शिंगांना रंग द्यायचा, त्यांना सजवायचे, अंगावर रंगीबेरंगी झूल चढवायची आणि सायंकाळी त्यांची वाजतगाजत मिरवणूक काढायची. त्यानिमित्ताने सर्व गाव एकत्र येतो. खान्देशात तर पुरणपोळी ऐवजी खापरावरचे मांडे करण्याची पद्धत आहे. ताज्या दुधाबरोबर मांड्यांची चव काही वेगळीच असते. श्रावण संपताना आपल्या लाडक्या गणपती बाप्पाची प्रतिक्षा सुरू होते. माहेरवाशीणी सासरी परततात आणि गौरी गणपतीच्या तयारीला लागतात. नव्या उत्सवाचे नवे रंग. आपल्या संस्कृतीचं हेच तर वैशिष्ट्य आहे. आनंद देणं आणि आनंद घेणं हे तिचं मूळ आहे. वेगवेगळे सण आणि उत्सव माणसांना एक सुत्रात बांधतात. विविधरंगाने नटलेला श्रावणही हाच संदेश देत आपला निरोप घेतो.


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
067
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com

*With best compliments from*

# SAMARTH
## URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.

**HEAD OFFICE:** Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum. **Ph.: 2431357, 2403968, 4202100**

**RC Nagar Branch:** Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. **Ph.: 2443161**
**Tilakwadi Branch:** Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. **Ph.: 2430357**
**Shahapur Branch:** 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Belgaum. **Ph.: 2431257**
**Khanapur Branch:** 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, **Ph.: 6363090655**

### AKSHAY DEPOSIT SCHEME

| | | | |
|---|---|---|---|
| 46 days to 180 days | 6.00% PA | 2 years | 9.00% PA |
| 181 days to 364 days | 6.50% PA | 3 years | 10.00% PA |
| 1 year | 8.00% PA | | |

Senior Citizen 1% extra*

### NIRANTAR

| | |
|---|---|
| 1 year | 8% PA |
| 2 years | 9% PA |
| 3 years | 10% PA |

*T&C Apply



**Adv. Ajay A. Sunalkar**
Chairman



**Rtn. Abhay V. Joshi**
Vice - Chairman

### BOARD OF DIRECTORS

Ganapat A. Kulkarni • Vinayak G. Joshi • Pradeepkumar G. Kulkarni
Arvind S. Kulkarni • Maltesh G. Patil • Sunanda C. Altekar • Chaya N. Joshi
Anil V. Bhandari • Umesh D. Sungar • Parashuram M. Kamble • Ashok H. Pujeri
Raghavendra S. Kesnur - Secretary • Gouri S. Bidi - Gen. Manager

**A LEADING CO-OPERATIVE SOCIETY IN BELGAUM DISTRICT**

anandads

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

विद्यार्थी गुणगौरव सोहळा, अकोला




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH